# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 16 November 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १६ नोव्हेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

भाजपचे ज्येष्ठ नेते तथा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज राज्यात मेरा बूथ सबसे मजबूत या कार्यक्रमात पक्षाच्या कार्यकर्त्यांना दुरदृष्यप्रणालीद्वारे मार्गदर्शन केलं. प्रत्येक मतदान केंद्रावर मतदानाचा दिवस उत्सव म्हणून साजरा करावा, सर्वांनी यात एकजुटीनं आणि उत्साहानं सहभागी व्हावं, असं आवाहन यावेळी त्यांनी केलं आहे.

****

भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांच्या आज राज्यात ठिकठिकाणी सभा आज होत आहेत. यामध्ये ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी विधानसभा निवडणुकीसाठी आज सोलापूर, पुणे आणि सांगली इथं प्रचार करत आहेत, तर भाजप नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गडचिरोली, चंद्रपूर, मुंबई आणि पुणे इथं प्रचार करतील.

काँग्रेस नेते राहुल गांधी आज दोन रॅलींना संबोधित करणार असून प्रियांका गांधी तीन रॅलींना संबोधित करतील.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार सोलापूर, पुणे आणि नाशिकमध्ये प्रचार करत असून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार हेही सातारा आणि रायगडमध्ये प्रचार करतील.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे मुंबई आणि ठाण्यात आज प्रचार करणार आहेत.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून नायजेरिया, ब्राझिल आणि गुयाना या तीन देशांच्या दौऱ्यावर जात आहेत. या दौऱ्यात ते नाईजेरियामधील वरिष्ठ नेत्यांसोबत धोरणात्मक भागीदारीचा आढावा घेतील आणि द्विपक्षीय संबंध वाढवण्यासंदर्भात चर्चा करतील.

त्यानंतर १८ तारखेला ते ब्राझील इथं सुरू असलेल्या जी–२० शिखर परिषदेला उपस्थित राहतील. १९ ते २१ दरम्यान पंतप्रधान गयाना इथं जाणार आहेत.

****

उत्तर प्रदेशातील झाशी इथल्या वैद्यकीय महाविद्यालयातील, बाल अतिदक्षता विभागाला, काल रात्री लागलेल्या आगीत दहा नवजात बालकांचा मृत्यू झाला. विद्युत तारांच्या शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याची शक्यता जिल्हा अधीक्षक अविनाश कुमार यांनी वर्तवली. या बाल अति दक्षता विभागात ५४ बालकं दाखल झाली होती. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या दुर्घटनेचा आढावा घेत जिल्हा प्रशासनाला आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या दुर्घटनेबद्दल अतीव दुःख व्यक्त केलं आहे.
दरम्यान, पंतप्रधान सहाय्यता निधीतून मृत बालकांच्या कुटुंबियांना दोन लाख रुपयांची तर जखमी बालकांच्या कुटुंबियांना वीस हजार रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे.

****

रेल्वेच्या माध्यमातून राज्यात १ लाख ६४ हजार ६०५ कोटी रुपयांची गुंतवणूक होत असल्याची माहिती केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. राज्यात ६ हजार किलोमीटरच्या रेल्वे मार्गांचे काम सुरू असल्याची माहितीही वैष्णव यांनी यावेळी दिली.

****

देशभरात मोठ्या प्रमाणावर आर्थिक बचत निर्माण करण्यासाठी आणि सामाजिक सुरक्षा तरतुदींत वाढ करण्यासाठी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेनं केलेल्या लक्षणीय बदलाचं, केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री डॉ मनसुख मांडविय यांनी कौतुक केलं आहे. काल नवी दिल्ली इथं इपीएफओच्या ७२ व्या स्थापना दिनानिमित्त ते बोलत होते. यावेळी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपल्या कर्तव्याचं पालन करताना सचोटी, समर्पण, सहानुभूती आणि व्यावसायिकतेची मूल्य जोपासावी, असं आवाहन त्यांनी केलं.

****

आज देशभरात राष्ट्रीय पत्रकार दिन साजरा केला जात आहे. समाजातील स्वतंत्र आणि जबाबदार पत्रकारांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी पत्रकार दिन साजरा केला जातो. पत्रकारितेचं कर्तृत्व, पारदर्शकता आणि सुशिक्षित

समाजाच्या निर्मितीसाठी पत्रकारांच्या जबाबदारीला प्रोत्साहन देणं हे या दिवसाचं उद्दीष्ट आहे.

✻✻✻✻

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, राजकीय जाहिरातींचे पूर्वप्रमाणीकरण करण्यासाठी लातूर जिल्हास्तरावर माध्यम प्रमाणिकरण आणि संनियंत्रण समिती कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. उमेदवार किंवा प्रतिनिधींनी जाहिरात प्रसारित होण्याच्या किमान तीन दिवस अगोदर प्रमाणिकरणासाठी विहित नमुन्यातील अर्ज समितीकडे सादर करावा. समितीकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर ४८ तासांत अर्ज निकाली काढण्यात येतील असं प्रशासनाने म्हटलं आहे.

✻✻✻✻

लातूर शहरात मतदान जनजागृतीसाठी आज मॅरेथॉन आणि वॉकेथॉनचं स्पर्धा घेण्यात आली. जिल्हा क्रीडा संकुलावर सकाळी या स्पर्धा झाल्या.

✻✻✻✻

परभणी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात मतमोजणीच्या कार्यपद्धतीबाबतचं प्रशिक्षण काल पार पडलं.

दरम्यान, मतदान प्रक्रियेसाठी परभणी जिल्हा पोलिस दल सज्ज झालं आहे. निम लष्करी दलाच्या तुकड्या जिल्ह्यात दाखल झाल्या असून संवेदनशील भागात संचलन केलं जात आहे

✻✻✻✻

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात आज हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

दरम्यान, सातारा शहर आणि जिल्ह्यात काल मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला. सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या काही भागातही सलग दुसऱ्या दिवशी पावसानं झोडपून काढलं. या पावसामुळं भातशेतीचं नुकसान झालं आहे.

✻✻✻✻